# संगीतसंशोधन - काही दिशा

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - साहित्य सहकार, संपा. ग त्र्यं माडखोलकर, साहित्य सहकार संघ लि., मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय प्रकाशन, मे १९६९)

संगीतविषयक जे जे काही लिखाण होते त्यात संशोधनात्मक लिखाणाचाही मोठा भाग असतो. परंतु मराठीतील लिखाणाकडे पाहता काय आढळते? कै. भातखंडे, कै. मुळे, कै. आचरेकर इ. काही नावे सोडल्यास या लिखाणाला संशोधन म्हणता येईल का असा प्रश्न पडतो. निदानपक्षी संशोधनात्मक लिखाणाच्या बऱ्याचशा बाजू मराठीतील संगीतसंशोधनात उपेक्षित राहिल्या आहेत असे वाटू लागते. संगीतसंशोधनाचे स्वरूप काय याविषयीचा विचार थबकला आहे आणि म्हणून संगीतसंशोधनही काहीसे एकांगी झाले आहे. तेव्हा संगीतसंशोधनाच्या काही फारशा न मळलेल्या वाटा कोणत्या ह्याविषयी थोडासा विचार आज अभिप्रेत आहे.

प्रथमतः हे लक्षात घेतले पाहिजे की संगीतसंशोधन तीन प्रकारचे असते. आणि हे तीनही प्रकार सारख्याच महत्त्वाचे आहेत. आता हे तीनही प्रकार संगीत या एकाच क्षेत्राशी संबंधीत असल्याने त्यांचे अंतर्गत संबंध असणार व असतात. पण तरीही या तिन्ही प्रकारचे संशोधन स्वतंत्रपणे चालविता येते. हे तीन प्रकार पुढील प्रमाणे :

१) ऐतिहासिक

२) भाष्य

३) सामग्री (डेटा) जमविणे

ऐतिहासिक संशोधन म्हणजे संगीतावरील ग्रंथांच्या कालाचा वा ग्रंथकारांच्या कालाचा निर्णय करणे, संगीतकार, त्यांचे शिष्योपशिष्य वा पुत्रपौत्र इ.च्या वंशावळ्या तयार करणे; प्रकाशात न आलेली हस्तलिखिते शोधणे; वाद्ये वा सांगीतिक दृष्ट्या महत्वाच्या स्थळांचे इतिहास लिहिणे इ. होय. किंबहुना ज्या मूलभूत संशोधनाचा पुढील संशोधन प्रकारांना व अवस्थांना पाया म्हणून उपयोग होईल त्या संशोधनास ऐतिहासिक म्हणावे. ऐतिहासिक संशोधन तथ्ये (Facts) जमा करते आणि याशिवाय पुढील संशोधन प्रकारांचा विचारही करता येत नाही.

भाष्य वर्गात मोडणारे संशोधन म्हणजे ज्या तथ्यांचा वर उल्लेख केला त्यावर आवश्यक त्या प्रक्रिया करून त्यांचे महत्त्व, त्यांची अर्थपूर्णता जोखणारे संशोधन होय. तथ्ये नुसती एकत्र आणून भागत नाही. त्यांचे अंतर्गत संबंध तपासणे, विस्तृत परिमाणांत त्यांना पाहणे ह्या क्रिया झाल्याशिवाय त्यांना अर्थ प्राप्त होत नाही. या भाष्याच्या अवस्थेत तथ्याचे तथ्य म्हणून महत्त्व संपते. त्यांच्या परस्पर संबंधातून एक आकारबंध तयार होऊ लागतो.

या तऱ्हेचे भाष्य करण्यास अर्थात निर्जीव, सजीव दोन्ही तऱ्हेची तथ्ये चालू शकतात. एखादे पुस्तक, एखादा ग्रंथ लावणे, त्यावर भाष्य करणे हे जसे शक्य आहे, तसेच एखाद्या कलावंताच्या कलेवर भाष्य करणेही शक्य आहे. दोन्ही बाबतींत तथ्ये ही चिंतनविषय झालेली असतात आणि विश्लेषणशक्तीचे कार्य जोरात चालू झालेले असते. एक वस्तू म्हणून त्यांना निरखून-पारखून घेतले जाते व मग त्यांची गुंफण केली जाते. ऐतिहासिक संशोधनाच्या अवस्थेत तथ्ये गोळा केली जातात, तर भाष्याच्या अवस्थेत त्यांना गुंफले जाते असा हा मुख्य फरक आहे.

संशोधनाचा आणखी एक प्रकार म्हणजे सामग्री (Data) गोळा करणे. ऐतिहासिक संशोधन आणि ही सामग्री गोळा करण्याची अवस्था यांच्यात सरमिसळ होते असे वाटेल. पण या दोन्ही प्रकारात दोन मुख्य फरक आहेत. एक फरक असा की ऐतिहासिक अवस्थेतील संशोधन थोडेसे भूतकाळाकडे झुकलेले असते. जे होऊन गेले आहे त्याच्या खुणा, त्यासंबंधीचा पुरावा, पुनर्दर्शन आणि परंपरेचे सम्यक् आकलन यासाठी उपलब्ध करून देणे हे ऐतिहासिक संशोधनाचे मुख्य कार्य होय. कोणताही प्रश्न समजण्यासाठी त्याचा इतिहास ज्ञात हवा या सूत्रानुसार या संशोधनाची दिशा ठरत असते. या उलट सामग्री गोळा व्हायची असते. आजच्या समाजाच्या अवस्थेतून आज काय घडत आहे याचा तपशील जमविणे ही या संशोधन प्रकारामागील प्रेरणा असते. या तपशीलाला समकालीन संदर्भ असतो. कालच्यापेक्षा त्याची नजर लागलीच तर उद्याकडे असते.

सामग्री गोळा करणे आणि तथ्ये गोळा करणे यात दुसरा फरक आहे, त्याचे मूळ संख्याशास्त्राच्या आजच्या प्रगतीमध्ये व विद्युत्-मेंदूच्या वाढत्या उपयोगात आहे. संगीताचा अभ्यास करणाऱ्यांची समाजशास्त्रीय वर्गवारी, त्यांच्या कौटुंबिक, आर्थिक स्थितीचे त्यांच्या संगीताभ्यासाशी असलेले नाते इ. गोष्टींचा अभ्यास हा आता शक्य झाला आहे. ज्या मोठ्या प्रमाणावर आणि ज्या बहुमुख व बहुविध तपशिलात ह्या तऱ्हेच्या पाहण्या वा गणत्या व्हाव्या लागतात. त्यामुळे संख्याशास्त्र वा विद्युत्-मेंदू इ.च्या उपयोगाशिवाय या दिशेने पाऊल टाकणे अशक्यच. या गोष्टीचा उपयोग ऐतिहासिक संशोधनाच्या अवस्थेत फारसा नाही हे लक्षात येईल.

या तिन्ही संशोधन प्रकारांच्या स्वरूपाविषयी आणखी एक पोट विचार असा की क्रमांक दोन व तीनचे प्रकार हे पहिल्यापेक्षा अधिक गतिमान म्हटले पाहिजे. अस्तित्वात असलेल्या नव्हे तर जीवंत असलेल्या सांगीतिक सत्यांबरोबर दोन व तीन क्रमांकाच्या संगीत प्रकारांचा प्रत्यक्ष संबंध असल्याने या स्वरूपगत गतिमानतेचा असा आढळ होतो ही गोष्ट उघड आहे. होत असलेल्या गोष्टी अर्थातच बदलतही असतात आणि म्हणून त्याच्याशी संबंधित संशोधनप्रकारही गतिमान असणे हे क्रमप्राप्त असते.

आता जर मराठीतील संगीत-संशोधनात्मक लिखाणावर नजर टाकली तर मुख्यतः पहिल्या व काही प्रमाणात दुसऱ्या संशोधन प्रकारावर त्यात भर दिलेला आढळतो. याची कारणे काय?

पहिले कारण असे की आमचे सारे संशोधन साहित्यक्षेत्रातील संशोधनाच्या चालीवरच होत राहिले. (संगीतावर लिहिणाऱ्यांपैकी किती साहित्यिक होते याची आकडेवारी पाहणे ह्या संदर्भात मोठे उपयुक्त ठरेल). त्यामुळे जुने ग्रंथ पाहणे, त्यांचे अन्वयार्थ तपासणे, त्यांचा कालनिर्णय करणे; वा साहित्यशास्त्राच्या धर्तीवर वर्गीकरणे इ. करून संगीताची व्यवस्था लावणे अशा कार्यातच संगीत संशोधन घुटमळत राहिले. अशा कार्यात कदाचित संगीताचा संबंध विज्ञानाशी कसा आहे याचाही विचार झाला (उदा. श्रुतिचर्चा इ.), पण यातही भूतकालीन ग्रंथ, वा भूतकालीन परंपरा इ.चे सावट काही संगीतसंशोधनावरून दूर झाले नाही. खुद्द विज्ञानात व ध्वनिशास्त्रात पाश्चात्त्यांनी १९व्या शतकात केलेल्या संशोधनाचीही आपल्याकडे फारशी दखल घेतली गेली असे नाही. संगीताच्या प्रत्यक्ष उत्पादन-संवहन-ग्रहण या तीनही अवस्थांशी सरळसरळ संबंध असलेल्या शास्त्रांची जर ही कथा तर मानव्य विद्यांची काय कथा? मानसशास्त्र, मानववंशशास्त्र, भाषाशास्त्र इ.च्या साहाय्याने आमचे संगीतसंशोधन आपली पुढली वाटचाल करू शकले नाही तर ते एका कोत्या आवर्तात सापडेल याची जाणीव आता कोठे होऊ लागली आहे. साहित्यशास्त्राचा (म्हणजे त्यात रूढ असलेल्या संशोधनपद्धती आणि त्यात संशोधन विषय म्हणून मान्य झालेले विषय यांचा) पांगुळगाडा सोडून आपली दृष्टी इतर मानव्य विद्या व त्यातील संशोधन याकडे फिरविल्याखेरीज आमचे संगीतसंशोधन खऱ्या अर्थाने फलदायी होणार नाही.

तिसऱ्या प्रकारचा संशोधनप्रकार आपल्याकडे जवळजवळ मुळीच आढळत नाही, याला कारण असे की संगीताचा सर्वसाधारण विद्यार्थ्यांच्या शिक्षणक्रमात समावेश होत नाही. संगीत शिकवून फायदा काय असा प्रश्न विचारला जातो. आणि 'शाळा

म्हणजे नोकरीसाठी उमेदवार तयार करण्याची जागा' असे मार्गदर्शक तत्त्व असेपर्यंत शाळेत संतुलित आणि संपन्न असा मानसिक विकास साधण्यासाठी संगीत एका विशिष्ट रूपाने शिकविणे आवश्यक आहे हे पटणे अवघड आहे. छोटी छोटी, सोपी सोपी समूहगाने शिकवून, म्हणायला लावून; या गाण्यातील विषयाचा भोवतालच्या जगाशी संबंध ठेवून; मुलांच्या मनात जगाविषयी अनुकूल बंध निर्माण होतात, त्यांना निर्मितिक्षमतेचा अनुभव येतो आणि परिणामतः अधिक समतोल नागरिक निर्माण होतात, यासारख्या कारणपरंपरा आमच्या शैक्षणिक धोरणास मानवणाऱ्या नाहीत. तसे असते तर संगीताची सामाजिक पाहणी होणे आणि संगीतास शिक्षणात योग्य ते स्थान मिळणे अवघड झाले नसते. संगीताचे शिक्षणात काय स्थान असावे, किंबहुना कलाशिक्षणाचे समाजजीवनात काय स्थान असावे याविषयीचे आमचे विचार जोपर्यंत अधिक मूलग्राही व शास्त्रीय होत नाहीत तोपर्यंत तिसऱ्या प्रकारच्या संशोधनाचा संगीत हा विषय होऊ शकतो हेच मुळी आमच्या संशोधकात सहजासहजी रुजणारे विचारबीज नाही.

सुरुवातीच्या तीन संशोधन प्रकारात न समाविष्ट केलेला पण ज्या प्रकारचे संशोधन होणे आवश्यक, अगदी जरूरीचे असूनही अजिबात झाले नाही, त्याला 'प्रत्यक्षोपयोगी संशोधन' (Applied research) म्हणता येईल. या प्रकाराला बाजूला काढण्याचे कारण इतकेच की इतर प्रकारांपेक्षा हा आर्थिक फायद्यातोट्याच्या गणिताशी संबंधित असूनही दुर्लक्षिला गेला आहे हे प्रकर्षाने जाणवावे. तंबोरा, सतार इ. वाद्ये तयार करण्याची शेकडो वर्षांची अखंडित चालू परंपरा असूनही एकदा नीट लावल्यावर कमीजास्त न होणारी वाद्ये आमच्याकडे का तयार होत नाहीत? अशी वाद्ये तयार झाल्यास त्यांचे अनुकूल आर्थिक परिणाम होणार नाहीत काय? जुन्या वाद्यांत सुधारणा वा भारतीय संगीताच्या पिंडास मानवणारी नवीन वाद्ये तयार करून आमच्या संगीतातील स्वनरंगाचा (Tonal colour) अभाव जर नाहीसा केला तर (सध्याच्या पाश्चात्त्यांच्या भारतीयकरणाच्या युगात) त्याचे फायदे जाणविण्याइतके होतील हे उघड नाही काय? मग याही संशोधनाची आमच्याकडे आबाळ का?

एकंदरीने भारतीयांची प्रवृत्ती प्रत्यक्षोपयोगी संशोधनाकडे कमीच असे सरसकट उत्तर देण्याव्यतिरिक्त आणखीही एक उत्तर सुचण्यासारखे आहे. वाद्ये तयार करणे हे एक कौशल्य आहे, शास्त्र नव्हे अशी एक समजूत आमच्या मनाच्या कोपऱ्यात कुठेतरी घर करून राहिलेली आहे. शास्त्र हे प्रयोगशाळेत हवे तेव्हा, कुणाच्याही हस्तक्षेपाखेरीज व्यक्तिनिरपेक्षरित्या कार्यशील होऊ शकते. ते ग्रंथबद्धही होऊ शकते. पण रक्तातून मुरलेले, पिढीजाद चालत आलेले आणि कुटुंबाची खाजगी मालमत्ता असलेले, परक्यास न शिकविता येण्यासारखे गूढ ज्ञान ते कौशल्य असा एक समज भारतात सर्वच बाबतीत चालत आलेला दिसतो, मग ते वैद्यक असो वा कलाकुसरीचे काम असो. या परिस्थितीत प्रत्यक्षोपयोगी संशोधन मागे पडावे यात नवल ते काय? कुलात चालत आलेल्या विद्यांच्या बाबतीत संबंधित विद्येचे संस्कार अवतीभोवती सतत असतात व त्यामुळे विशिष्ट विद्या म्हणजे घराण्याने प्राणपणे सांभाळावयाचा वेद अशी धारणा राहून त्यात बाजारूपणा शिरत नाही हे सत्य मला मान्य आहे. पण बाजारात जाण्याअलीकडे प्रयोगशाळेत जाण्याचाही टप्पा उपलब्ध असतो. विज्ञानाच्या झपाट्याने वाढणाऱ्या आवाक्यात या पिढीजाद विद्या सापडल्यास जगभरच्या श्रेष्ठ प्रज्ञावंतांच्या प्रतिभेच्या स्पर्शाने त्या उजळून निघतात त्या या प्रयोगशाळेतच हे आमच्या अजून लक्षात येत नाही, आणि यात या 'पवित्र' वाटणाऱ्या विद्यांचेच नुकसान होते.

संगीताच्या बाबतीत संशोधनपरता किती रूपे धारण करू शकते आणि यात तिला कोणकोणत्या अडचणींना भारतीय संदर्भात तोंड द्यावयाचे आहे याचे अल्पसे दिग्दर्शन येथे केले आहे. यामागील उद्देश "चालावी बहुतांची अंतरे" इतकाच आहे हे आवर्जून सांगण्याची गरज नाही.